**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक २३ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **वाघ हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबातील सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याची कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची मागणी.**
2. **सन २०२३ आणि २०२४ चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर; १ जुलै रोजी मुंबईत पुरस्कार वितरण समारंभ.**
3. **राष्ट्रपतींच्या हस्ते आज दुसऱ्या टप्प्यातल्या पद्म पुरस्कारांचं वितरण.**
4. **येत्या काही तासांत विदर्भातील बहुतांश भागात वादळी पर्जन्यमानाचा इशारा.**

---------------------------------

शपथविधी

विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. प्राजक्त तनपुरे, रवींद्र फाटक, अनिकेत तटकरे, दुष्यंत चतुर्वेदी, विक्रम काकडे, अरुण लखानी, बसवराज पाटील, प्रवीण पोटे, अमरनाथ राजूरकर, राजेंद्र राऊत, धैर्यशील कदम, गोकुळ गीते, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, नंदकिशोर महाजन आणि सुहास शिरसाट यांना सभापती राम शिंदे यांनी सदस्यत्वाची शपथ दिली.

---------------------------------

विजय वडेट्टीवार

चंद्रपूर, गडचिरोली या विदर्भातील  जिल्ह्यांमध्ये वाघ-मानव संघर्षाची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. तेंदुपत्ता, मोहफूल आणि इतर वनउत्पादनांच्या संकलनासाठी जंगलात जाणाऱ्या नागरिकांवर वारंवार वाघांचे हल्ले होत असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर विधानसभेत लक्षवेधीद्वारे गंभीर प्रश्न उपस्थित करत कॉंग्रेस विधानमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. ज्या कुटुंबातील कर्ता सदस्य वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडतो, त्या कुटुंबाचे आयुष्यच उद्ध्वस्त होते. २५ लाख रुपयांची मदत मिळाली तरी मृत व्यक्ती परत येत नाही. त्यामुळे अशा कुटुंबातील पात्र सदस्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. या प्रश्नाकडे केवळ वन्यजीव संवर्धनाचा विषय

म्हणून न पाहता मानवी जीवन, रोजगार आणि पुनर्वसनाचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून.....

*(विधिमंडळ -व्हॉइस कास्ट)*

*राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यावरून ५८ टक्के करायचा निर्णय घेतल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. या कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता देखील वाढवला असून वार्षिक वेतनवाढीचा दर २ वरून ३ टक्के करायची घोषणाही त्यांनी केली. महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक दरवाढीसह सर्व मिळून प्रलंबित असलेली सुमारे ५ हजार ६४९ कोटी रुपयांची रक्कम लवकर अदा करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असेल, असं आश्वासन यांनी दिलं. यानंतर २९ जून रोजी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेलं धरणं आंदोलन मागे घेतल्याचं सरनाईक यांनी जाहीर केलं. राज्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी दूधभेसळ अधिनियम तयार करायचं काम सुरू असून त्यात भेसळीच्या गंभीरतेनुसार ६ महिने ते आजन्म तुरुंगवास आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली. मिलिंद नार्वेकर यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचं विनियमन आणि शासकीय कर्तव्यं पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध सुधारणा विधेयकाला विधानपरिषदेने आज मंजुरी दिली. महाराष्ट्रात वीज निर्मिती केंद्राला पुरवला जाणारा कोळसा काही प्रमाणात निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे वीज निर्मिती संचात बिघाड होत असून कोळसा पुरवठ्याबाबत नव्याने निविदा काढल्या जातील, तेव्हा पुरवठादार निकृष्ट मालाचा पुरवठा करणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला ते विधानसभेत उत्तर देत होते. राज्यात वीज निर्मिती केंद्रातले संच वारंवार बंद पडत आहेत याकडे वडेट्टीवार यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं.*
*(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

----------------------------------

अमली पदार्थ

राज्यातल्या प्रत्येक पोलिस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या पथकाची स्थापना केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. २०२३ मध्ये सरकारने या कृती दलाची स्थापना केली होती आणि या मार्फत गेल्यावर्षी सव्वा पाचशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ नष्ट केले होते, ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत जास्त अंमली पदार्थ सापडतील तिथल्या पोलिस निरीक्षकावर कारवाई करण्याचा इशारा देखील मुख्यमंत्र्यांनी दिला.

---------------------------------

कृषी पुरस्कार

राज्यातील कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, तसेच कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२३ आणि २०२४ चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर केले आहेत. हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, दिनांक १ जुलै रोजी मुंबई इथं हा गौरवशाली सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. सन २०२३ आणि २०२४ साठी एकूण १८९ पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात येणार आहे.

---------------------------------

पदम पुरस्कार

आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. पद्म पुरस्कार सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ६५ मान्यवरांचा पद्म पुरस्कार देऊन राष्ट्रपतींनी सन्मान केला. टेनिसपटू विजय अमृतराज, अभिनेता मामुटी, पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि क्रिकेटपटू रोहित शर्मा या मान्यवरांचा यात समावेश आहे. यावर्षी केंद्र सरकारनं एकूण १३१ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून, यात ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ जणांना मरणोत्तर सन्मानित केलं गेलं.

---------------------------------

मनसे मोर्चा

नागपुरात आज महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना यांनी कथित बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांविरोधात एल्गार मोर्चा काढला. संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर काढण्यात आलेल्या मोर्चात संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या

संख्येने सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान आंदोलकांनी राज्य सरकारकडे बाईक टॅक्सी सेवांबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. राज्यात बाईक टॅक्सी सेवांसंदर्भात लागू असलेल्या नियमांचं पालन न करता काही कंपन्या प्रवासी वाहतूक सेवा चालवत असल्याचा आरोप संघटनेने केला. यामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इतर वाहतूक व्यवसायांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचं तसच प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचं आंदोलकांनी म्हटलं. मोर्चानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रशासनामार्फत राज्य सरकारला निवेदन सादर करून कथित बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली.

---------------------------------

मातंग मोर्चा

अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड वर्गीकरण करून न्याय्य हक्क द्यावा आणि समाजावरील अन्याय थांबवावा, या मागणीसाठी वाशिममध्ये मातंग समाजाच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेल्या या मोर्चात महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुसूचित जातीचे वर्गीकरण करावे, अशी मागणी आंदोलकांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

---------------------------------

अधीक्षक हर्ष पोद्दार

गुन्ह्यांचा तपास अत्यंत काटेकोर आणि पारदर्शक पद्धतीने शक्य व्हावा, तपासातील अनावश्यक मानवी हस्तक्षेप टाळता यावेत तसेच खटला कायद्याच्या कसोटीवर टिकेल इतपत भक्कम स्वरुपात मांडता यावा, या दृष्टीने राज्य सरकारच्या 'मार्व्हल' या विशेष उद्देश संस्थेच्या वतीने 'एआय इन्व्हेस्टीगेशन प्लॅटफॉर्म' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तपास प्रणाली विकसित करण्यात येत आहे. या प्लॅटफॉर्मचा वापर सुरुवातीला दोन पोलिस युनिट्समध्ये प्रायोगिक तत्वावर केला जाणार असून अनुभव लक्षात घेऊनच त्याची राज्यभरात अंमलबजावणी केली जाणार आहे. मार्व्हलचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी यासंदर्भात माहिती दिली. हा प्रकल्प ज्या पोलिस युनिट्समध्ये प्रायोगिक तत्वावर राबविला जाणार आहे, त्या जिल्ह्यांची निवड पोलिस महासंचालक कार्यालयाकडून होणार असल्याच पोद्दार यांनी सांगितल.

---------------------------------

शिक्षक पुरस्कार

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत दिल्या जाणाऱ्या यंदाच्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी ऑनलाईन स्व-नामांकन प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. राज्यातील पात्र शिक्षकांनी या संधीचा लाभ घ्यावा असं आवाहन शिक्षण संचालनालयाने केलं आहे. ऑनलाइन अर्जासाठी “नॅशनल अवॉर्ड्स टू टीचर्स डॉट एज्युकेशन डॉट जीओव्ही डॉट इन” या संकेतस्थळावर १० जुलैपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.

---------------------------------

पालखी

आषाढी वारीकरिता पंढरपूरला जाण्यासाठी शेगाव इथुन प्रस्थान केलेल्या संत श्री गजानन महाराजांची पालखी आज अकोला जिल्ह्यातल्या डाबकी इथं पोहचली. दिवसभर शहर परिक्रमेनंतर दुपारी मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या प्रांगणात पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली. या दिंडीत सुमारे सातशे वारकरी सहभागी झाले आहेत.

---------------------------------

हवामान

नागपुरात आज आकाशात काळ्या मेघांनी गर्दी केली असून येत्या काही तासांत वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा,चंद्रपूर, अमरावती, अकोला, वाशिम आणि भंडारा या सर्व ठिकाणी आगामी काही तासांत पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवलेली आहे. दरम्यान, नैऋत्य मोसमी पाऊस १४ दिवसांच्या विलंबानंतर सक्रिय झाला असून हवामान विभागाच्या अंदाजानुसार उद्या आणि परवा राज्यातील अनेक भागांत दमदार  पावसाची शक्यता आहे.

---------------------------------